कला व वाणिज्य

महाविद्यालय वडूज.

घाडगे आरती गजानन

बी. कॉम भाग-३

सेमिस्टर-६

विषय: व्यावसायिक पर्यावरण.

हजेरी क्र- १२१

मार्गदर्शक-

खोत सर

Scanned with CamScanner

PAGE No.
DATE.

प्र भारतीय अर्थव्यवस्थेवरील उदारीकरणाचे परिणाम स्पष्ट करा.

अ) भारतीय अर्थव्यवस्थेवरील उदारीकरणाचे इष्ट परिणाम -

भारतीय अर्थव्यवस्थेवरील उदारीकरणाचे इष्ट परिणाम पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात -

① अन्नधान्याचे उत्पादन वाढले -

उदारीकरणाच्या धोरणाने भारतातून निर्यात होणाऱ्या अनेक कृषी उत्पादनावरील नियंत्रणे दूर करण्यात आली. अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता लाभल्याने भारताला सन 1977 नंतर अन्नधान्याची आयात करावी लागली नाही. अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेमुळे सरकारने अन्नधान्य व इतर शेतमालाच्या निर्यातीस प्रोत्साहन दिले. सन 2009-10 मध्ये भारताच्या एकूण निर्यातीत शेतमालाचा हिस्सा 10.59% एवढा होता. परंतु उदारीकरणामुळे शेतीतील गुंतवणूक घटल्याचे दिसून येते.

② शेतीसाठी योग्य उपाययोजना -

उदारीकरणाच्या धोरणाने सरकारने शेतीसाठी योग्य उपाययोजना राबविल्या. यामध्ये जनतेला अन्नधान्याचा पुरवठा योग्यरित्या व्हावा. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या धान्यांच्या किंमती स्थिर राहाव्यात. गरिबांना योग्य दरात अन्नधान्य उपलब्ध व्हावे यासारख्या उपाययोजना केल्या.

③ कृषीमालाची वाढती निर्यात -

उदारीकरणाने भारतीय शेती उत्पादनात विविधता आली आहे. व्यापारी पिके, बागकाम, उदा., फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ, पुष्प संवर्धन इ.ची मागणी वाढली आहे. उदारी-

Scanned with CamScanner

करणामुळे शेतीक्षेत्राचे उत्पादन व व्यापार दोन्ही बाजूंनी विकासासाठी भरपूर सुसंधी निर्माण केल्या आहेत. शेतीमध्ये रोजगाराच्या संधी आहेत. शेतमाल निर्यातीचे प्रमाण वाढले आहे. तसेच देश शेतीनिर्यातीसाठी अनुकूल बनला.

④ शेतीचा वाढता लाभ –

अनेक अर्थशास्त्रज्ञांनी उदारीकरणाच्या धोरणाने भारतीय शेतीला लाभ होण्याची शक्यता असल्याचे मत मांडले आहे. शेती व्यवसायात नवे तंत्रज्ञान, सिंचनव्यवस्था, उच्चपुतीची उत्पादन बियाणे, खते, कीटकनाशके इ. चे उत्पादन केल्याने अन्नधान्याच्या उत्पादनात भारताने स्वयंपूर्णता प्राप्त केली आहे.

⑤ परवाना मुक्त व नियंत्रणमुक्त धोरण –

उदारीकरणाच्या धोरणाने भारतात परवानामुक्त व नियंत्रणमुक्त औद्योगिक धोरण स्विकारले आहे. सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगांची संख्या कमी केली. तसेच खाजगी क्षेत्रातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले. विदेशी उद्योगांना देशामध्ये उद्योग स्थापन करण्यासाठी चांगले वातावरण निर्माण झाले.

⑥ विदेशी व्यापारावर चांगला परिणाम –

उदारीकरणाच्या धोरणाचा विदेशी व्यापारावर चांगला परिणाम झाला. विदेशी गुंतवणूक वाढून भारताच्या व्यापार तोलातील प्रतिकूलता कमी झाली. भारतात आर्थिक सुधारणा अंमलात आणण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यवहार होय. उद्योगांची पुनर्रचना केल्याने तसेच उद्योगांची स्पर्धाशक्ती ...

आहे.

⑦ विविध सेवांची प्रगती -
उदारीकरणाच्या धोरणाने भारतातील रेल्वे, रस्ते, जलवाहतूक इ. च्या मार्गात व साधनांत वेगाने वाढ झाली. यामुळे कार्यक्षमता व उत्पादकता वाढली. टेलिफोन, ~~ई~~, टी.व्ही. रेडिओ, संगणक इ. दळणवळणाच्या साधनांमुळे मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे.

⑧ इतर लाभ -
उदारीकरणाच्या धोरणाने भारताला अनेक चांगल्या लाभांचा फायदा मिळाला. विदेशी चलनाचा वाढता साठा हे उदारीकरणाच्या धोरणाचे यश आहे.

ब) भारतीय अर्थव्यवस्थेवरील उदारीकरणाचे अनिष्ट परिणाम -
भारतीय अर्थव्यवस्थेवरील उदारीकरणाचे अनिष्ट परिणाम पुढीलप्रमाणे -

① रोजगार निर्मिती वाढली नाही -
भारतासारख्या वाढत्या लोकसंख्येच्या देशात रोजगार निर्मिती वेगाने झाली नाही. हे उदारीकरणाचे धोरण पुरेश्या प्रमाणात रोजगार निर्माण करू शकले नाही. त्यामुळे मुळातच प्रचंड बेकारी असलेल्या या देशात आणखी बेकारी वाढण्याचा धोका आहे. असे टिकाकारांचे मत आहे. म्हणूनच भारतासारख्या लोकशाही देशात हे धोरण राबविणे कठीण आहे.

② आंतरराष्ट्रीय संस्थांचा दबाव -

निधी व जागतिक बँक या संस्थांच्या द
घेतला आहे. याचा अर्थ भारताने हे धो
आर्थिक गरज म्हणून स्विकारले नाही.

③ शेतीवर अनिष्ट परिणाम -

उदारीकरणाच्या धोर
शेतीच्या विविध क्षेत्रात प्रगती झाली. तसेच
धान्याचे उत्पादन वाढले परंतु काही काला
नंतर शेतीमधील गुंतवणूक कमी झाली. स
2009-10 मध्ये शेतीतील एकूण गुंतवणूक 2
एवढी होती. जी शेती 58% लोकांना उपजी
पुरविते तिच्यावरील ही गुंतवणूक अतिशय क
आहे. बिहार, ओडिसा, मध्यप्रदेश या गरी
राज्यांमध्ये अन्नधान्याचे उत्पादन कायम कम
आहे. थोडक्यात उदारीकरणाने शेतीकडे दुर्ल
केले.

④ लघु उद्योगावर अनिष्ट परिणाम -

भारतासारख
विकसनशील देशात लघु उद्योगांचे महत्त्व
दृष्टीने महत्त्वाचे आहे. उदारीकरणाच्या या
धोरणाने भारतातील लघुउद्योगांच्या विकासाक
लक्ष दिले नाही. त्यामुळे आजारी उद्योगांची
संख्या वाढली.

⑤ भारतीय उद्योगांना धोका -

उदारीकरणाच्या धोर
विदेशी व्यापाराला भारतीय अर्थव्यवस्था मुक
करण्यात आली. परंतु त्यामुळे भारतातील यो
उद्योगांना 51% विदेशी गुंतवणूकीचा धोका
निर्माण झाला. त्यामुळे काही चांगले तंत्रज्ञान
व उद्योग या क्षेत्रातून बाहेर जाण्याचा स
धोका निर्माण झाला.

Scanned with CamScanner

PAGE No.
DATE

⑥ सामाजिक सेवांवर परिणाम -

उदारीकरणाच्या काळात भारतातील विविध राज्यात सामाजिक सेवांवर केल्या जाणाऱ्या खर्चावर मोठा परिणाम झाला. त्याद्वारे सामाजिक सेवांवर सरकारद्वारे केला जाणारा खर्च मर्यादित झाला. तसेच अन्नधान्यावरील अनुदान कमी करण्यात आले.

⑦ तुटीचे प्रमाण जास्त -

उदारीकरणाच्या धोरणाचे एक महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे वित्तीय तुट कमी करणे हे होय. परंतु ही तुट कमी करण्यात सरकारला फारसे यश मिळाले नाही.

उदारीकरणाचे काही चांगले आणि वाईट परिणाम अर्थव्यवस्थेवर होत असले तरी भारताच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करतात उदारीकरणाचे धोरण भारतासाठी आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

प्र. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्ट्ये व का स्पष्ट करा.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्ट्ये -

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

① आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे -

दुसऱ्या मह पुर्वी अनेक कारणामुळे प्रत्येक राष्ट्रातील सहक ची भूमिका संपुष्टात आली होती. त्यातूनच आ युद्ध सुरू झाले. नाणेनिधीमध्ये जी सभासद रा आहेत. त्यांच्यातील चलनविषयक सहकार्य वाढ चलनविषयक प्रश्न सोडविणे, तसेच भविष्यकाळा युद्धाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून नाणेनिधी या उद्दिष्ट्याला महत्त्वाचे स्थान दिले आहे.

② आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ -

आंतरराष्ट्रीय व्यापार वाढ घडवून आणणे व व्यापारतोलात समतोल निर्माण व्हावा यासाठी सभासद राष्ट्रातील वा उत्पन्न व रोजगार पातळी वाढवण्यासाठी म करणे. यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने मह ची भूमिका पार पाडली आहे.

③ विनिमय दरात स्थैर्य -

दुसऱ्या महायुद्धापुर्वी विनि दरात अस्थैर्य निर्माण झाले होते. त्याचा जागति व्यापारावर प्रतिकूल असा परिणाम झाला. यासाठी देशादेशातील चलनव्यवस्था व्यवस्थित ठेवण्याचे कार्य तसेच चलनमुल्यातील घट टाळणे इ. साठी विनिमय दरात स्थैर्य प्रस्थापित करणे नाणेनिधीचे उद्दिष्ट्य आहे.

Scanned with CamScanner

④ जागतिक शांतता -
अविकसित व विकसनशील राष्ट्रात नेहमी अशांतता असते ही अशांतता शांततेच्या मार्गाने सोडवण्याचा प्रयत्न नाणेनिधी-मार्फत केला जातो.

⑤ संतुलित विकासासाठी मदत -
विकसनशील राष्ट्रा-तील विकास प्रक्रियेमुळे प्रादेशिक असमतोलाची समस्या निर्माण होते. यासाठी संतुलित विकास साधता यावा यासाठी नाणेनिधी मदत करते

⑥ गुंतवणुकीस प्रोत्साहन -
श्रीमंत देशांकडून मागास व अल्प विकसित राष्ट्रात गुंतवणूक वाढली पाहिजे. यासाठी प्रेरणा देण्याचे कार्य नाणेनिधीक-डून केले जाते.

⑦ अल्पकालीन साधनसंपत्तीचा पुरवठा करणे -
सभासद राष्ट्रांना त्यांच्या विदेशी व्यवहाराच्या ताळेबंदात निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड देता यावे या-साठी नाणेनिधी अल्पकालासाठी साधनसामग्री उपलब्ध करून देते

⑧ सभासदांमध्ये विश्वास निर्माण करणे -
नाणेनिधीकडून सभासद देशाला आर्थिक सहाय्य मिळत असल्याने पूर्णपणे विकास साधता येईल असे विश्वासाचे वातावरण नाणेनिधी निर्माण करते व देशाच्या आर्थिक विकासासाठी मदत करते.

Scanned with CamScanner

PAGE No.
DATE

## आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची कार्ये -

आंतरराष्ट्रीय निधीची कार्ये पुढीलप्रमाणे -

① विनिमय दर ठरवणे -

नाणेनिधीचे सभासद स्विकारणाऱ्या प्रत्येक देशाला आपल्या चल मुल्य अमेरिकन डॉलरच्या संदर्भात किंवा सोन्याच्या संदर्भात त्याचे किती प्रमाण अस ते जाहीर करावे लागते. चलनाचे मुल्य स्थि ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक देशाची असते. मध्ये काही बदल करावयाचा असेल तर नाणेनिधीची परवानगी घ्यावी लागते.

② अल्पकालीन मदत -

एखादया सभासद देशा आंतरराष्ट्रीय व्यवहारातून निर्माण झालेला मतोल दूर करण्यासाठी नाणेनिधीकडून अल्प लीन मदत केली जाते. त्यासाठी एकूण ~~नाणेनिधीकडे~~ चलननिधीतून 25% परकीय चल त्या देशांना उपलब्ध करून दिले जाते.

③. विनिमय नियंत्रणे दूर करणे -

राष्ट्राराष्ट्रांमधील वाढती स्पर्धा स्वावलंबन इ. हेतूंनी अनेक राष्ट्रांनी परकीय व्यापारावर नियंत्रणे लादले आहेत. अशी नियंत्रणे नाणेनिधीमार्फत दूर दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

④ तांत्रिक मदत व सल्ला -

सदस्य राष्ट्र आर्थिक मदतीबरोबरच तांत्रिक मदत विषयक सल्ला देण्याचे कार्य नाणेनिधीमा निधीतील केंद्रिय

Scanned with CamScanner

व राजकोषीय विभाग तयार करण्यात आला आहे. या विभागातील तज्ञ सभासद देशांना गरजेनुसार सल्ला व सेवा उपलब्ध करून देतात.

⑤ वित्तीय सेवा पुरवणे -

प्राथमिक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या अविकसित देशांना त्या वस्तूंच्या निर्यातीमध्ये नेहमीच किंमतीच्या अनिश्चिततेला तोंड द्यावे लागते. यासाठी नाणेनिधी पुरक अशा सुविधा उपलब्ध करून देते.

⑥ नैसर्गिक आपत्तीत मदत -

दुष्काळ, भुकंप महापूर इ. सारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी नाणेनिधी तत्पर सुविधा उपलब्ध करून देते.

⑦ कर्ज सुविधा -

नाणेनिधी सदस्य देशांना कोणत्याही प्रकारची चौकशी न करता एका निश्चित कालावधीसाठी ठरावीक अशा रकमेपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देते. या कर्जाचा वापर शक्यतो विनिमय नियंत्रणासाठी केला जातो.

⑧ विस्तारित निधी सुविधा -

विकसनशील सदस्य राष्ट्रांना अर्थव्यवस्थेत सहस्थलात्मक बदल घडवून आणण्यासाठी दीर्घकालीन अशी धोरणे ठरवावी लागतात व त्यानुरूप आर्थिक विकास घडवून आणला जातो. यासाठी नाणेनिधीने ही सुविधा सुरू केली आहे.

अशाप्रकारे वरील सर्व मुद्द्यांच्या स्पष्टीकरणाद्वारे व मुद्द्यांच्या आधारे आंतरराष्ट्रीय

Scanned with CamScanner

नाणेनिधीची काही उद्दिष्टे स्पष्ट करता येतात. त्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे काही कार्ये स्पष्ट करता येतात.

Scanned with CamScanner